# मुंबई विद्यापीठ


दूरध्वनी नं:–०२२–२२८७३६९६
वेबसाईट :–www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.**


पत्र क्र.रासेयो/ ९८८ / २०१८–१९
दिनांक : २९ जुन, २०१८

प्रति,

प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये,

मा. महोदय/महोदया,

वनमहोत्सवाचे औचित्य साधुन दिनांक ०१ जुलै ते ०७ जुलै, २०१८ दरम्यान राज्यात १३ कोटी वृक्ष लागवड करण्याचा निर्णय राज्य शासनाच्या वनविभागाने घेतला आहे. गेल्या वर्षी दिनांक ०१ जुलै, २०१७ रोजी राज्यात ४ कोटी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प शासनाने जाहीर केला होता. या संकल्पाला लोकसहभागाची जोड लाभली आणि राज्यात एकाच दिवशी ४ कोटी वृक्ष लागवड करण्यात आली.

राज्यातील वृक्षाच्छादन वाढावे व त्या माध्यमातुन हरीत महाराष्ट्र ही संकल्पना साकार व्हावी यादृष्टीने येत्या तीन वर्षात ५० कोटी वृक्ष लागवड करण्याचा निर्धार शासनाने केला आहे. याचाच भाग म्हणून ०१ जुलै ते ०७ जुलै, २०१८ दरम्यान राज्यात १३ कोटी वृक्ष लागवड करण्याचा महाराष्ट्र शासनाचा संकल्प आहे.

दिनांक ०१ ते ०७ जुलै, २०१८ दरम्यान वृक्षारोपण करण्यात यावे. सदर वृक्षारोपणासाठी विद्यापीठ, महाविद्यालये यातील विद्यार्थी व शिक्षक इतर स्वयंसेवी संस्था यांनी सहभाग घ्यावा अशी सुचना केली आहे. राष्ट्रीय सेवा योजना संदर्भात सर्व महाविद्यालयीन रा.से.यो. एककांनी महाविद्यालय परिसर, दत्तक गाव/वस्ती इत्यादी ठिकाणी आपल्या विद्यार्थी संख्ये **प्रमाणे** (प्रति स्वयंसेवक १ रोप) वृक्षारोपण करून त्याची निगा राखण्याची जबाबदारी घ्यावी व अहवाल विद्यापीठ रा.से.यो. कक्षाकडे पाठविण्यात यावा. वृक्षरोपणाचे स्थळ, संख्या, सहभागी विद्यार्थी संख्या, रोपांचे प्रकार इत्यादी माहिती अहवालात नमूद करण्यात यावी. वृक्षारोपण करण्यासाठी आवश्यक असलेल्या रोपांच्या उपलब्धतेसाठी आपल्या परिसरातील नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका, सामाजिक वनिकरण रोपवाटिका यांच्याशी संपर्क साधावा.

आपला विश्वासू

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग